# हापूस



## मराठी शिक्षक पुस्तिका

# 6

**संकल्पना**
अनुज गुप्ता

**लेखिका**
मिनाक्षी आनंदा पवार

**संपादक**
विद्या रायकर

Harbour Press®
INTERNATIONAL

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आई | ३ |
| २. | खरी श्रीमंती | ४ |
| ३. | शेतकऱ्याची चतुराई | ५ |
| ४. | जागृत प्रजा | ६ |
| ५. | फुलपाखरू | ७ |
| ६. | गणेशोत्सव | ८ |
| ७. | वाल्याचा वाल्मीकी झाला | ९ |
| ८. | नव भारतभूचे शिल्पकार | ९ |
| ९. | आईला मदत करूया! | ११ |
| १०. | निसर्गाचे अनमोल देणं | १२ |
| ११. | डॉ. अब्दुल कलाम | १३ |
| १२. | लुई ब्रेल | १४ |
| १३. | कुंभारासारखा गुरु नाही | १५ |
| १४. | बहुला गाय | १६ |
| १५. | निरोगी जीवन | १८ |
| १६. | व्याकरण | १९ |

# १ आई

### ✦ काव्य परिचय

- आई मुलांसाठी काय-काय करू शकते, ती मुलांना लहानाचे मोठे करताना किती कष्ट करते, अनेक गोष्टींचा त्याग करते; परंतु आपल्याला (मुलांना) चांगलीच शिकवण देते; चालायला, बोलायला, शिकविताना ताठ मानेने जगात वावरायला, योग्य निर्णय घ्यायचे हे शिकविते.
- आईच्या ह्या प्रेमळ दुनियेत लहानाचे मोठे होताना संस्काराचे धडे घेऊन संस्कारी जीवन जगूया त्याचबरोबर अनेक चांगल्या गोष्टी आत्मसात करूया, अंगी बाळगूया असे कवयित्री 'आई' या कवितेतून सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

### ✦ उद्देश

- आईच्या त्यागाविषयीची, तिच्या मायेविषयीची तसेच तिने आपल्यावर केलेल्या संस्काराची ओळख कवितेद्वारे केली आहे. त्यामुळे आईविषयीची परोपकाराची भावना सदैव मनात असली पाहिजे हे विद्यार्थ्यांना कवितेमार्फत समजावणे.

### ✦ अध्यापन कृती

- प्रथम वि. ना. त्यांच्या आईविषयी काय भावना आहे हे जाणून घेणे.
- आई आपल्यासाठी (मुलांसाठी) काय-काय करते

  **उदाहरण**- आपली काळजी घेते, जेवण बनविते, आजारी असताना काळजी घेते, जर नोकरी करत असेल तर वरील सर्व जबाबदारी सांभाळून नोकरी करते. (हे प्रकर्षाने विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणे.)
- अशीच आईची महिमा सांगणारी कविता आपण शिकूया याप्रकारे कवितेची ओळख वि. ना. करून देणे.
- कठीण शब्दांचे अर्थ विद्यार्थ्यांना विचारत कवितेच्या प्रत्येक ओळीचा अर्थ समजावणे.
- कविता ताला-सुरात म्हणवून घेणे.
- कवितेखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. आई मुलांना शिकवण देते, शिक्षा-ज्ञान देते, मुलांसाठी कष्ट करते आणि अनेक गोष्टींचा त्याग करते, आपल्यावर खूप प्रेम, माया करते; म्हणूनच आई ही शिकवण, शिक्षेची, लळा, प्रेम आणि मायेची मूर्ती आहे.

२. सुखी जीवन जगण्यासाठी माणसाने एकमेकांविषयी मानवता ठेवली पाहिजे हे त्यांनी शिकले पाहिजे, मोठ्यांना आदर दिला पाहिजे, शिस्तीचे पालन केले पाहिजे ह्या सर्व गोष्टी सुखी आयुष्य जगण्यासाठी कराव्यात असे कवयित्री सांगते.

**प्र २.** १. कवितेतील आई मधील 'आ' चा अर्थ आहे 'आत्मा' आणि 'ई' च आर्थ आहे 'ईश्वर'.

२. आईची दुनिया प्रेमळ आहे.

३. आपल्याला या जगात वावरायला आईने शिकविले.

४. कवितेत आईने मोठ्यांचा आदर करायला सांगितले.

५. आईने सांगितल्याप्रमाणे आपल्याला माणसाची मानवता शिकायची आहे.

**प्र ३.** १. आई   २. परमेश्वर

**प्र ४.** १. शिकवण आणि शिक्षेची

<u>कष्ट आणि त्यागाची</u>

लळा, प्रेम अन् मायेची
अशी मूर्ती ही आईची ।।

२. माणसाची मानवता शिकूया
मोठ्यांना आदर देऊया
शिस्तीचे पालन करूया
सुखी आयुष्य जगूया ।।

प्र ५. १. आई – माता, जननी २. प्रेम – माया ३. आयुष्य – जीवन
४. दुनिया – जग ५. आदर – सन्मान

प्र ६. १. मूर्ती – मुर्त्या २. धडा – धडे

## २ खरी श्रीमंती

### ✦ पाठ परिचय

- पाठ वासू नावाच्या मुलावर आहे. वासू हा गरीब मुलगा असतो. स्वभावाने अतिशय चांगला व हुशार असूनही वर्गात बरीच मुले श्रीमंत असल्यामुळे ते वासूशी फारसे बोलत नाही. ते वासूला खेळायलाही घेत नाही.
- एक दिवस कामानिमित्त वासू छोट्या वाटेने जातो. तो रस्ता खडबडीत असल्याने फारसे कोणी त्या रस्त्याचा वापर करत नाही; पण वासू पटकन जाता याव म्हणून त्या रस्त्याने जात असताना मागे कोणीतरी पडण्याचा आवाज येतो. तो त्याच्या वर्गातील तेजस असतो पण तरीही वासू तेजसला मदत करतो व त्यामुळे वासू व तेजसची मैत्री होते.

### ✦ उद्देश

- विद्यार्थ्यांना गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता त्यांच्या मनात एकतेची व मदतीची भावना निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी पाठातील गोष्ट/कथा ही गोष्टीरूपाने विद्यार्थ्यांना सांगावी.
- पाठावर आधारित छोटे-छोटे प्रश्न विचारावेत.
- विद्यार्थ्यींची त्यांच्या मित्र/मैत्रिणी बरोबर असलेली भावना जाणून घेणे.
- शिक्षकांनी पुस्तकातील पाठ परत वाचून त्यातील कठीण शब्दांचे अर्थ विद्यार्थ्यांना विचारावेत.
- पाठाचा अर्थ समजला आहे की नाही हे पडताळून पहावे.
- पाठाखालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

### ✦ उत्तरे

प्र १. १. वासू हा गरीब मुलगा होता. त्याचा स्वभाव अतिशय चांगला होता. तो अभ्यासात हुशार होता. तसेच तो इतरांना मदत करण्यासाठी नेहमीच तयार असे.

२. वासूने छोट्या रस्त्यातून जाताना बघितले की मागच्या बाजूला एक मुलगा सायकलवरून पडला आहे व दगड लागल्यामुळे त्याच्या पायातून रक्त वाहत आहे.

३. वासूने तेजसला रस्त्यावर पडलेले बघून तेजसबद्दल असलेला कोणताही राग मनात न धरता पटकन आपल्या खिशातील रूमाल काढून तेजसच्या जखमेवर बांधला. त्याची सायकल बाजूला लावली आणि त्याला धरून जवळच्या दवाखान्यात घेऊन गेला.

प्र २. १. तेजसला दवाखान्यात वासूने नेले.

२. तेजस हा मनाने, विचाराने श्रीमंत होता.

३. पैसा नसूनही वासूकडे चांगल्या विचारांची, प्रेमाची श्रीमंती होती.

प्र ३. १. चांगले २. लाज ३. खडबडीत

४. ओरडण्याचा ५. पायातून

प्र ४. १. दीन २. मार्ग ३. सूत ४. गृह

प्र ५. १. श्रीमंत २. शत्रू ३. सकाळी

४. अविचार ५. वाईट ६. ढ, मठ्ठ

प्र ६. १. रस्ते २. पैसा ३. सायकली ४. घरे

प्र ७. १. हिरमुसला २. खडबडीत ३. रस्त्याने

४. उपचार ५. डॉक्टर

## ३ शेतकऱ्याची चतुराई

✦ **पाठ परिचय**

- पाठात एक शेतकरी आहे जो चतुर आहे. त्याच्या शेतात चांगले पीक येत नसे तेव्हा तो देवाची प्रार्थना करतो. देव प्रसन्न होतो. तो देवाला चांगले पीक आले की निम्मं पीक देण्याचे कबूल करतो. देव त्याची परीक्षा घेण्यासाठी प्रत्येक वेळी पीक घेण्याच्या वेळी त्याला पिकाचा कोण ता भाग हवाय यावर अट घालतो. पण शेतकरी तेवढ्याच चातुर्याने देवाच्या परिक्षेत कसा पास होतो याची मजेदार कथा पाठात वर्णिली आहे.

✦ **उद्देश**

- एका मजेदार गोष्टीरूपाने विद्यार्थ्यांना मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- चातुर्याने आपण कोणत्याही गोष्टीतून मार्ग काढू शकतो हे समजावणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ शिकवण्यापूर्वी काही पिकांची ओळख करून देणे. जसे– जमिनीवर येणारी पिके, जमिनीखालील/भुमीगत पीके. तसेच विशेष करून पाठात आलेली पीके उदा. शेंगा, ज्वारी, मका, तांदूळ.
- शिक्षकांनी गोष्टीरूपाने हा पाठ शिकवावा व शेतकरी ज्यावेळी जे पीक घेतो तेव्हा त्या पिकाच्या शेतीचा फोटो या व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविल्यास विद्यार्थ्यांना पाठ अधिक स्पष्टपणे कळेल.
- शिक्षकांनी कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून काढून घेत पाठ समजवावा. पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

प्र १. १. शेतकऱ्याच्या शेतात चांगले पीक येत नसे तेव्हा त्याला शेतात चांगले पीक येण्यासाठी काय करावे? ही काळजी पडली. त्यासाठी त्याने देवाची प्रार्थना केली.

२. शेतकऱ्याची चतुरता बघून देवाने शेतकऱ्याची पुन्हा एकदा परीक्षा घेण्याचे ठरविले. त्याने मेघराजाला आज्ञा केली की तू यावर्षी फक्त डोंगरावरच पड.

प्र २. १. देव शेतकऱ्याला प्रसन्न झाला.

२. देव व मेघराजाचे बोलणे शेतकऱ्याने पाळलेल्या पोपटाने ऐकले.

३. देवाला शेतकऱ्याच्या चातुर्याची परीक्षा घ्यायची होती.

४. तिसऱ्या वर्षी देवाने शेतकऱ्याला सांगितले की ह्यावर्षी पिकाच्या वरचा निम्मा व खालचा निम्मा असे दोन्ही भाग मी घेणार.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | पोपट | २. | डोंगरावरच | ३. | कौतुक | ४. | फसवतोय |
| **प्र ४.** | १. | देव | २. | शेतकरी | ३. | देव | ४. | पोपट |
| **प्र ५.** | १. | परमेश्वर | २. | विनंती | ३. | चिंता | ४. | राघू |
| | ५. | हुशार | ६. | कावा, खुबी | | | | |
| **प्र ६.** | १. | दानव | २. | खालचा | ३. | उत्तर | | |
| **प्र ७.** | १. | पिके | २. | शेतकरी | ३. | तुरा | | |
| **प्र ८.** | १. | देवी | २. | शेतकरीण | ३. | पोपटीण | | |

## ४ जागृत प्रजा

### ✦ पाठ परिचय

- विजयनगरचा राजा हा आपल्या प्रजेची परीक्षा घेण्यासाठी त्याचा वजीर सुखदेव बरोबर एक बेत आखतो. गावाच्या बाजारपेठेत शिपायांकडून रातोरात एक खड्डा खणून घेतो व शिपायांना गावात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सांगितले. जेव्हा गावकऱ्यांनी बाजारात अचानक खड्डा पाहिला तेव्हा त्याच्या बाजूला एक काठी व त्यावर लाल फडके बांधून ते आपापल्या कामाला लागले. रात्री गावकऱ्यांनी त्वरित सभा बोलवली. त्यात राजा व वजीर वेश बदलून गेले. गावकऱ्यांनी खड्डयामुळे होणाऱ्या नुकसानांवर चर्चा केली व प्रत्येक घरातून शंभर रूपये काढून खड्डा बुजवण्याचे ठरविले. राजाला हे सर्व ऐकून खूप समाधान वाटले व त्याने गावकऱ्यांचे कौतुक करत सरपंचांना गावाच्या विकासासाठी दरवर्षी पन्नास हजार रूपये निधी देण्याचे घोषीत केले.

### ✦ उद्‌देश

- प्रत्येक व्यक्तीने समाज, देश व आजूबाजूचा परिसर यांच्या विषयी जागृतता निर्माण करणे आवश्यक आहे याची जाण निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात कर्तव्यदक्षता, जागृतता अशा गुणांचा विकास करणे.

### ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना पाठ शिकविण्यापूर्वी ते देशाबद्‌दल, आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत काय करतात? आपल्या समाजातील गोष्टिंबाबत जागृत असतात की नाही हे जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.
- कठीण शब्दांचा अर्थ सांगत विद्यार्थ्यांना पाठ समजवावा. नाटक रूपाने देखील विद्यार्थ्यांकडून अभिनय करवून पाठ समजवता येईल.
- पाठ व्यवस्थित समजला आहे की नाही हे प्रश्नोत्तरांच्या साहाय्याने समजून घ्यावे.
- पाठाखालील स्वाध्याय विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावा.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. राज्यातील प्रजेची नम्रता, गावातील स्वच्छता, माणसा-माणसातील प्रेम, एकमेकांविषयी आपूलकी, गावातील शांतता या सर्व गोष्टी बघून राजाला स्वत:चा अभिमान वाटू लागला.

२. राजाने प्रजेची पार परीक्षा घेण्यासाठी रातोरात शिपायांकडून गावातील बाजारपेठेत

जाणाऱ्या मार्गावर एक खड्डा खणला व दोन शिपायांना गावात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सांगितले.

३. गावातील बाजारपेठेत अचानक खड्डा पडलेला दिसला तेव्हा गावकऱ्यांनी खड्ड्याच्या बाजूला एका काठीला लाल फडके बांधून लावले की जेणेकरून त्यात कोणी पडू नये व आपापल्या कामाला गेलेत. रात्री त्यांनी त्वरित खड्डा बुजवण्याच्या विषयासाठी सभा बोलवली. या कृतीमुळे विजयनगरची प्रजा ही जागृत प्रजा ठरली.

**प्र २.** १. महेश्वरी राजा हा प्रेमळ व खूप विचारी होता.

२. राजा प्रजेच्या मनात नवनवीन विचार रूजवत असे.

३. अचानक बाजारपेठेत खड्डा कसा पडला? याचे लोकांना आश्चर्य वाटू लागले.

४. गावकऱ्यांनी खड्डा बुजवण्यासाठी प्रत्येक घरातून शंभर रूपये जमा करण्याचे ठरविले.

५. राजाने गावाच्या विकासासाठी दरवर्षी पन्नास हजार रूपये निधी घोषित केला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. सुखदेव | २. बेत | ३. सभा | ४. वेश | |
| **प्र ४.** | १. राजे | २. काठी | ३. खड्डे | ४. फडका | ५. रूपए |
| **प्र ५.** | १. नृप, नरेश | २. जनता, रयत | ३. पोषाख | ४. हर्ष | ५. प्रगती |
| **प्र ६.** | १. प्रजा | २. रागीट | ३. दुराभिमान | ४. प्रकाश | ५. दु:ख |

## ५ फुलपाखरू

✦ **काव्य परिचय**

- कवितेत फुलपाखरांचे सौंदर्य, त्याच्याविषयी माहिती दिली आहे. फुलपाखरांना का पकडू नये याची कारणे कवितेत दिलेली आहेत.

✦ **उद्‌देश**

- विद्यार्थ्यांना फुलपाखरूविषयी ज्ञान प्राप्त करून देणे.
- फुलपाखरूच नव्हे तर कोणतेही प्राणी किंवा पक्षी, कीटक यांना पकडून त्यांना इजा करू नये ही शिकवण विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.

✦ **अध्यापन कृती**

- कविता शिकविण्यापूर्वी शिक्षकांनी 'फुलपाखरू' या कीटकाविषयी विद्यार्थ्यांना असलेली माहिती काढून घ्यावी. फुलपाखरांना पकडल्यामुळे काय होते याविषयी त्यांना असलेले ज्ञान समजून घेणे.
- छोट्या-छोट्या प्रश्नांतून विद्यार्थ्यांना असलेले ज्ञान काढून घेण्याचा प्रयत्न करणे.
- पाठ्यपुस्तकातील कविता कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून काढून घेत समजवावी.
- कविता ताला-सुरात म्हणवून घ्यावी.
- कवितेखालील स्वाध्याय विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. फुलपाखराला स्पर्श करू नये; कारण फुलपाखरू खूप नाजूक असतात. त्यामुळे त्याला स्पर्श केल्यास पंख तुटण्याची शक्यता असते. आपल्याला आनंद मिळतो किंवा आपल्या खेळासाठी जर त्याला पकडले तर दु:ख का द्यायचे? तसेच आपणा सर्वांना देवाने जगण्याचा हक्क दिलेला आहे, सगळ्यांचा या सृष्टीवर हक्क आहे त्यामुळे सर्वांना आनंदाने जगू द्या.

२. फुलपाखरू आपल्या अल्पायुष्यात सर्वांना आनंद देते. फुलांफुलांवर जाऊन बागडते, गोड-गोड मधुरस पिते.

**प्र २.** १. फुलपाखरांचे आयुष्य अल्प असते.

२. फुलपाखरू फुलांवर बागडते.

३. लहान-थोरांना फुलपाखरू हवेहवेसे वाटते.

४. फुलांवर बसून फुलपाखरू मधुरस पिते.

५. फुलांना आणि फुलपाखरांना जपल्यावर आपल्याला आनंद मिळतो.

**प्र ३.** १. फुलपाखरू २. देव

**प्र ४.** १. मूल चूल पूल २. मान पान रान ३. महान तहान वहान

**प्र ५.** १. जीवन २. मधुर ३. आनंद ४. निसर्ग ५. ईश्वर

**प्र ६.** १. कडू २. दु:ख ३. मोठे ४. दानव ५. जवळ

## ६ गणेशोत्सव

✦ **पाठ परिचय**

- गणेशोत्सव साणाविषयी माहिती.
- गणेशोत्सव हा सण लोकमान्य टिळकांनी का सुरू केला? हा सण कशा पद्धतीने साजरा करतात? गणपतीचे आगमन व विसर्जन याविषयी माहिती पाठात दिलेली आहे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना गणेशोत्सव ह्या साणांमार्फत मराठी सणांची माहिती मिळवून देणे.
- सण साजरे करण्यामागचे कारण, पद्धत याची ओळख करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- गणेश चतुर्थी हा सण कसा साजरा करतात. सार्वजनिक गणेशोत्सव कसा साजरा करतात याची विद्यार्थ्यांना व्हिडिओ (चित्रफीत) दाखवून माहिती देणे.
- विद्यार्थ्यांच्या घरी गणपती येतच असतील तर वर्गात ज्याच्या घरी गणपती येतात ते कशापद्धतीने साजरा करतात हे विचारून नंतर पाठ शिकवावा.
- प्रश्नोत्तराच्या साहाय्याने पाठ विद्यार्थ्यांना समजला आहे की नाही हे जाणून येणे.
- पाठाखालील स्वाध्याय विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. गणेशोत्सव हा सण आला की सर्व भाविक आनंदात असतात. सर्व भाविक एकत्र येऊन हा सण उत्साहात साजरा करतात. गणपती जवळ आले की गणपतीच्या मूर्ती विकत घेणे, पूजेची तयारी, सजावट, प्रसादाची खरेदी, सार्वजनिक गणपतीसाठी वर्गणी जमा करणे, मंडप घालणे, देखावा तयार करणे अशा प्रकारे पूर्वतयारी केली जाते.

**प्र २.** १. गणेशोत्सव बाळ गंगाधर टिळक यांनी सुरू केला.

२. श्रीगणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना भाद्रपद शुद्ध चतुर्थीस होते.

३. गणपतीला दूर्वा व जास्वंदीचे फूल प्रिय आहे.

४. गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात साजरा होतो.

५. गणपती ही विद्येची देवता असून तो सुखकर्ता, दु:खकर्ता आणि रक्षणकर्ता आहे. अशी गणेशभक्तांची हा उत्सव साजरा करण्यामागची एक भावना आहे.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | दिन | २. | आवडता | ३. | शोभा, थाट | | | |
| | ४. | हेतू, प्रयोजन | ५. | गणेश | | | | | |
| **प्र ४.** | १. | लहान | २. | संध्याकाळ | ३. | अप्रिय | | | |
| | ४. | रात्र | ५. | रंक | | | | | |
| **प्र ५.** | १. | फुले | २. | मोदक | ३. | राजे | | | |
| | ४. | मुर्त्या | ५. | नदी | ६. | देश | | | |

## ७ वाल्याचा वाल्मीकी झाला

✦ **पाठ परिचय**

• वाल्या नावाचा दरोडेखोर असतो; जो रानातून येणाऱ्या-जाणाऱ्यांना लुबाडत असतो. नारदमुनीनी हे बघितले व त्याने वाल्याला हे करण्याचे कारण विचारतो तेव्हा बायका-मुलांसाठी हे पाप मी करतो असे वाल्या सांगतो, पण बायका-मुले त्याच्या पापात वाटेकरी होण्यास नकार देतात. तो नारदमुनींकडे क्षमा मागून तो पापातून मला मुक्त करा असे सांगतो. तेव्हा वाल्या कोळी 'राम राम' असा जप करण्यास सांगतो. पुढे हाच वाल्या कोळी वाल्मीकी कसा होतो; ही कथा पाठात वर्णिली आहे.

✦ **उद्देश**

• एका पौराणिक कथेची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे. 'रामायण' कसे लिहिले गेले याची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. रानात वाल्या कोळी नावाचा दरोडेखोर राहत होता.
२. वाल्या कोळी लोकांना भीती आणि धाक दाखवून लुबाडत असे.
३. नारदमुनी 'नारायण नारायण!' हा जप करायचे.
४. नारदमुनींनी वाल्याला पापातून मुक्त होण्यासाठी 'राम राम' असा नामजप सांगितला.
५. वाल्मीकी ऋषींनी 'रामायण' लिहिले.

**प्र २.** १. विष्णूचे २. पाप ३. मुक्त ४. ऋषी ५. वाल्मीकी

**प्र ३.** १. नारदमुनी वाल्या कोळीला म्हणाला.
२. वाल्या कोळी नारदमुनींना म्हणाला.
३. वाल्या कोळी नारदमुनींना म्हणाला.
४. नारदमुनी वाल्या कोळीला म्हणाला.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ४.** | १. | परमेश्वर | २. | माफी | ३. | निर्णय | ४. | तन | ५. | जंगल |
| **प्र ५.** | १. | उत्तर | २. | चांगले | ३. | दानव | ४. | पुण्य | ५. | अपूर्ण |
| **प्र ६.** | १. | एकवचन | २. | अनेकवचन | ३. | अनेकवचन | | | | |
| | ४. | एकवचन | ५. | एकवचन | | | | | | |
| **प्र ७.** | १. | ऋषी | २. | वाल्या | ३. | मित्रांच्या | ४. | क्षमा | | |

## ८ नव भारतभूचे शिल्पकार

✦ **काव्य परिचय**

• या कवितेत कवयित्रीने विद्यार्थ्यांना देशाप्रती आपली कोणकोणती कर्तव्य आहेत याचे वर्णन केलेले आहे. यात मुले म्हणजे देशाचा भावी आधार आहे. या भारतभूच्या जडणघडणीत त्यांची

शिल्पकाराची भूमिका आहे. जसे की, आईवडिलांप्रमाणे गुरुजनांचा सन्मान करणे. आपल्या भावना बाजूला ठेवून कर्तव्य हे प्रथम श्रेष्ठ आहे हे समजणे. कर्तव्याची भूमिका बजावतांना मनात अमृताहून पवित्र विचार असणे हे महत्त्वाचे आहे.

- कवयित्रीने मुलांना ज्ञानातून शिवरायांच्या अंगी असलेली शूरता बाळगा, थोरासमान तुमच्याबरोबर ध्येय ठेवा तसेच विज्ञानयुगात आपले आदर्श सुद्धा जपणे महत्त्वाचे आहे असे सांगितले आहे. ज्ञान प्राप्त करत असताना नवीन काहीतरी अंगी बाळगा परंतु हे सगळे करत असताना मनात देशाभिमान असावा व शील हे शुद्ध असावे. मनात कोणताही भेदभाव नसावा. सर्वधर्मसमभावाची भावना मनात असावी.

## ✦ उद्देश

- विद्यार्थ्यांना भारतभूमीबद्दल असलेली कर्तव्याची ओळख करून देणे, त्याबाबत त्यांना जागृत करणे.
- देशासाठी ज्यांनी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देणे.

## ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना देशाप्रती त्यांची कोणकोणती कर्तव्य आहेत, जबाबदाऱ्या आहेत याची जाणीव करून देणे. छोट्या-छोट्या प्रश्नातून त्याचे देशाबद्दल असलेले मत ओळखणे कवितेतील ओळी त्यांच्या पर्यंत चर्चेतून पोहचवणे.

  उदा.- १. तुम्ही गुरुजनांना नेहमी कोणासमान मानाल?

  २. शिवरायांकडून तुम्हाला कोणता गुण घ्यायला आवडेल?

- कठीण शब्दांचा अर्थ समजावत कविता शिकवावी.
- ताला-सुरात कविता म्हणून घ्यावी. कवितेखालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. कवयित्रीने मुलांना ज्ञानातून शिवरायांच्या अंगी असलेली शूरता बाळगा, थोरांसमान तुमच्या बरोबर ध्येय ठेवा तसेच विज्ञानयुगात ह्याचा तू आदर्श स्वीकार असे सांगितले आहे.

**प्र २.** १. कवयित्रीने भारतभूचे शिल्पकार लहान मुलांना म्हटले आहे.

२. कवयित्रीने शिवबासमान शूरता अंगी बाळगण्यास सांगितली आहे.

३. आपल्या मनातील विचार अमृताहून पवित्र ठेवण्यास सांगितले आहे.

४. विज्ञानयुगात शिवबा समान शूरता, थोरांसमान ध्येय यांचा स्वीकार करावा.

**प्र ३.** १. आईसमान पवित्र <u>माना गुरुजनांना</u>

<u>कर्तव्य थोर जाणा सोडूनी भावनांना</u>

<u>अमृताहूनी पवित्र ठेवा</u> मनी विचार।।

२. शिवबासमान शूरता बाळगा अंगी

<u>थोरांसमान ध्येय ठेवा तुम्हा संगी</u>

<u>विज्ञानयुगात तू या आदर्श ते</u> स्वीकार।।

**प्र ४.** १. देशाभिमान २. शिल्पकार ३. पवित्र ४. शूरता ५. थोर

**प्र ५.** १. महान २. भूमी ३. चित्त ४. चारित्र्य

**प्र ६.** १. अपवित्र २. अविचार ३. निराधार ४. जुना ५. अशुद्ध

**प्र ७.** १. शिल्पकार २. थोरासमान ३. ज्ञानातूनी ४. विज्ञानयुगात

## ९ आईला मदत करूया!

✦ **पाठ परिचय**

- राजाला जीव-जंतू, किडे निरूपयोगी आहेत त्यांचा काहीही उपयोग नाही असे वाटत असे. त्यामुळे त्याने संशोधन करून घेतले. तेव्हा माशी व कोळी या कीटकांचा काहीही उपयोग नाही असे सिद्ध झाले तेव्हा त्याने माशी व कोळी यांना नामशेष करण्याचा आदेश दिला. याच दरम्यान राज्यावर दुसऱ्या राजाने आक्रमण केले असता त्याचा त्यात पराभव होतो व त्याला पलायन करावे लागते त्यावेळी जंगली माशी व कोळी यामुळे राजाचे प्राण कसे वाचतात हे गोष्टीरूपात सांगितले आहे.

✦ **उद्‌देश**

- जगात आलेला प्रत्येक जीव-जंतूचा काहीना काही उपयोग आहेच हे विद्‌यार्थ्यांना समजावणे.
- प्राणीमात्रावर दया करण्यास विद्‌यार्थ्यांना शिकविणे.

✦ **अध्यापन कृती**

- पाठ गोष्टीरूपाने विद्‌यार्थ्यांना सांगणे/नाट्‌यरूपाने पाठ विद्‌यार्थ्यांना समजवता येईल.
- विद्‌यार्थ्यांना पाठातील कथा समजल्यावर पाठ्‌यपुस्तकातील पाठ वाचून शिकविणे.
- कठीण शब्दांचे अर्थ समजावणे.
- पाठाखालील स्वाध्याय सोडवून घेणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. राजाला जीव-जंतू व किडे यांच्याविषयी असे वाटत असे की जगात फक्त जीव-जंतू, किडे यांचा जगाला काही उपयोग नाही.

२. दुसऱ्या राज्याचे आक्रमण झाले व राजा जीव वाचवण्यासाठी जंगलात पळून गेला. दुसऱ्या राजाचे सैनिक त्याचा पाठलाग करतच होते. त्यांना चुकवून राजा कसातरी एका झाडाखाली झोपला. खूप श्रमामुळे त्याला गाढ निद्रा आली. थोड्या वेळात एक जंगली माशी त्याच्या नाकावर बसते व त्याची झोपमोड होते. तेव्हा राजाला शत्रू येण्याची चाहूल लागते. राजा पुन्हा पळतो आणि एका गुहेत लपतो. काही तासातच गुहेच्या दारावर कोळ्याने जाळे विणलेले असते ते पाहून कोळ्याचे जाळे न तोडता कोणी आत जाऊ शकत नाही असे सैनिकांचे मत होते व ते तेथून निघून जातात. अशा प्रकारे माशी व कोळीमुळे राजाचे प्राण वाचले.

**प्र २** १. श्रमामुळे थकून झाडाखाली राजा झोपला.

२. शिकवण- जगात सर्व प्राणीमात्रांचा, जीव-जंतू, कीटक यांचा काहीना काही उपयोग असतोच. निरूपयोगी असे काहीही नसते.

३. राजा पळून जंगलात गेला.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | पाठलाग | २. | गुहेत | ३. | नामशेष |
| **प्र ४.** | १. | दुनिया | २. | वृक्ष, तरू | ३. | शोध |
| | ४. | मानव | ५. | नृप, नरेश | ६. | दुश्मन |
| | ७. | उजेड | ८. | वेगळे | | |
| **प्र ५.** | १. | काळोख | २. | रंक | ३. | कमी |
| | ४. | निरूपयोगी | ५. | मित्र | ६. | बाहेर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ६.** | १. | चूक | २. | चूक | ३. | बरोबर | | | |
| | ४. | चूक | ५. | बरोबर | | | | | |
| **प्र ७.** | १. | दुसऱ्या राजाचे सैनिक | २. | जंगली माशी | ३. | कोळी | | | |

## १० निसर्गाचे अनमोल देणं

### ✦ पाठ परिचय

- पाठात महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, लोणावळा- खंडाळा, भीमाशंकर या थंड हवेच्या ठिकाणाचे वर्णन, त्या ठिकाणची माहिती दिलेली आहे.

### ✦ उद्‌देश

- विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची ओळख करून देणे, माहिती देणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून ते सुट्टीत कोठे-कोठे फिरायला गेले आहेत? अशा सारख्या प्रश्नातून पर्यटन स्थळांविषयी माहिती मिळवून घ्यावी.
- पाठात आलेल्या स्थळांची नावे आल्यास विद्यार्थ्यांकडूनच अधिक माहिती विचारून घ्यावी. नंतर पाठातील पर्यटन स्थळांविषयी माहिती देऊन पाठ शिकवावा.
- पाठाखालील स्वाध्याय विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावा.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. माथेरान हे रायगड जिल्ह्यात येते, ते थंड हवेचे ठिकाण आहे. इथले हवामान अति थंड किंवा उष्ण असे कधीच नसते. इथे खूप प्रमाणात माकडं आढळतात. माथेरानमध्ये गाड्यांना बंदी असल्याने इथे पायी किंवा घोड्यावरून फिरावे लागते. झुकझुकगाडीतून प्रवासाची मौज लुटणे हे माथेरानच्या सहलीचे एक महत्त्वाचे आकर्षण आहे. गाड्यांना बंदी असल्यामुळे हे प्रदूषण विरहीत ठिकाण आहे.

२. पाचगणी येथील स्ट्रॉबेरी, तुती, केशरी गाजरे, मध या सोबतच जॅम, जेली, सरबत तयार करणाऱ्या कंपनीच्या उत्तम बागा हेदेखील पाचगणीचे आकर्षण आहे. थंड, कोरड्या व उत्साहवर्धक हवामानामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. त्यामुळे पाचगणीला 'आरोग्यधाम' असे म्हणतात.

**प्र २.** १. महाराष्ट्रासारख्या विस्तीर्ण पसरलेल्या प्रदेशात निसर्गाने सौंदर्याची उधळण केली आहे.
२. महाबळेश्वर महाराष्ट्राचे 'नंदनवन' म्हणून ओळखले जाते.
३. महाबळेश्वर तालुक्यातील भिलार गाव स्ट्रॉबेरीसाठी प्रसिद्ध आहे.
४. पाचगणी हे निसर्गसुंदर ठिकाण पब्लिक स्कूलसाठी प्रसिद्ध आहे.
५. भीमाशंकर या पर्यटन क्षेत्री बारा ज्योतिर्लिंगाचे एक ठिकाण आहे.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | सहलीसाठी | २. | सातारा | ३. | माकडांचे | | | | |
| | ४. | लोणावळा | ५. | भीमाशंकर | | | | | | |
| **प्र ४.** | १. | चूक | २. | चूक | ३. | चूक | ४. | बरोबर | ५. | बरोबर |
| **प्र ५.** | १. | प्रख्यात, विख्यात | २. | पर्वत | ३. | शीतल | | | | |
| | ४. | गरम | ५. | मजा | ६. | जमाव, दाटी | | | | |
| **प्र ६.** | १. | गरम | २. | कमी | ३. | अशांत | ४. | नवीन | | |
| **प्र ७.** | १. | गाड्या | २. | मंदिरे | ३. | ठिकाण | | | | |
| | ४. | तालुका | ५. | जिल्हे | ६. | कंपन्या | | | | |

## ११ डॉ. अब्दुल कलाम

### ✦ पाठ परिचय

- डॉ. अब्दुल कलाम यांचा परिचय व त्यांच्या जीवनातील त्यांच्या कारकीर्द मधील प्रवास सांगितला आहे.

### ✦ उद्देश

- डॉ. अब्दुल कलामांविषयी विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- सामान्य कुटुंबातील व्यक्ती आपल्या प्रयत्नाच्या जोरावर प्रगतीची उंची गाठू शकतात हे विद्यार्थ्यांना समजावणे.

### ✦ अध्यापन कृती

- डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनपटावर आधारित व्हिडीओ किंवा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवणे.
- विद्यार्थ्यांना अब्दुल कलामांविषयी असलेली माहिती प्रथम जाणून घेणे, पाठातील प्रसंग यावर चर्चा करणे व नंतर पाठ्यपुस्तकातील पाठ समजावणे.
- पाठाखालील स्वाध्याय सोडवून घेणे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. डॉ. अब्दुल कलाम यांनी भारत भूमीसाठी, तिच्या प्रगतीसाठी, तिला उच्चतेकडे नेण्याचे स्वप्न न पाहता ते सत्यात कसे उतरवावे हा दृष्टीकोन करोडो भारतीयांना दिला; म्हणून त्यांना भारतमातेचे महान सुपुत्र म्हटले आहे.

२. डॉ. अब्दुल कलाम जेव्हा हृषिकेशला गेले तेव्हा काही अंतरावर असलेल्या शिवानंद आश्रमात गेले. तेथे त्यांना स्वामी शिवानंद भेटले. कलाम हे हताश होते. त्यांना पाहून स्वामीजी बोलले की; बाळ का उदास आहेस? तू जीवनातील एका संग्रामात अपयशी ठरलास याचा अर्थ असा नव्हे की तू कर्तृत्ववान आणि यशस्वी बनू शकत नाही. कदाचित ईश्वराने तुझी निवड एखाद्या महान कार्यासाठी केली असेल कलामांना ते पटले.

**प्र २.** १. भारताचे महान व थोर सुपुत्र म्हणजे डॉ. अब्दुल कलाम.

२. डॉ. अब्दुल कलामांचे लहानपण खूप कष्टात गेले.

३. शाळेत असताना डॉ. अब्दुल कलामांना गणित विषयात रस होता.

४. डॉ. अब्दुल कलामांना 'एरोनॉटिकल अभियंता' म्हणून पदवी मिळाली.

५. डॉ. अब्दुल कलामांची उंची कमी होती म्हणून त्यांची पहिल्या नोकरीत निवड झाली नाही.

६. डॉ. अब्दुल कलामांचे वडील रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीतून नेण्या-आणण्याचा व्यवसाय करीत.

**प्र ३.** १. रामसुद्दीन २. डॉ. अब्दुल कलाम ३. डॉ. अब्दुल कलाम
४. विक्रम साराभाई ५. स्वामी शिवानंद

**प्र ४.** १. स्वामी शिवानंद डॉ. अब्दुल कलामांना म्हणाले.

२. डॉ. अब्दुल कलाम विक्रम साराभाईना म्हणाले.

३. स्वामी शिवानंद डॉ. अब्दुल कलामांना म्हणाले.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ५.** | १. | राष्ट्र | २. | वर्चस्व | ३. | मोठा , थोर | ४. | मेहनत |
| **प्र ६.** | १. | वास्तव, हकिकत | | | २. | अधोगती | ३. | अपयश |
| | ४. | मृत्यू | | | ५. | शंका, संशय | | |
| **प्र ७.** | १. | कार्य | २. | होड्या | ३. | शाळा | ४. | घरे |
| | ५. | पदव्या | ६. | कुटुंब | | | | |

**प्र ८.** १. रस असणे - आवड असणे.

वाक्य - मधूला संगीत शिकण्यात रस आहे.

२. प्रभाव असणे - छाप/पगडा असणे.

वाक्य - शामवर आईच्या संस्कारांचा खूप प्रभाव होता.

३. हताश होणे - निराश होणे.

वाक्य - अचानक पाऊस पडल्याने फिरायला जाण्याचे रद्द केल्यामुळे मोहन हताश झाला.

४. उदास होणे - दु:खी होणे.

वाक्य - आई गावावरून परत न आल्यामुळे सुजाता उदास झाली.

# १२ लुई ब्रेल

## ✦ पाठ परिचय

- लुई ब्रेल यांचे बालपण व कौटुंबिक परिचय.
- लुई ब्रेल यांनी त्यांची दृष्टी कशी गमावली याची कथा.
- लुई ब्रेल हे अंध असूनही त्यांनी शिक्षण कसे घेतले याची माहिती.
- ब्रेल लिपी मिळण्यामागची संकल्पना.

## ✦ उद्देश

- लुई ब्रेल यांचा परिचय करून देणे.
- ब्रेल लिपीची ओळख करून देणे.
- जिद्दीने आपण कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो हे पटवून देणे.

## ✦ अध्यापन कृती

- हेलन केलरची विद्यार्थ्यांना कथा सांगणे. यावरून लुई ब्रेल यांच्या विषयी असलेली माहिती जाणून घेणे, नंतर पाठ्यपुस्तकातील पाठाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांना विचारत पाठ समजावणे.
- पाठाखालील स्वाध्याय विद्यार्थ्यांकडून सोडवून घेणे.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. लुई ब्रेल यांचे वडील एक जिनगर होते. लुई ब्रेल हे वडिलांबरोबर त्यांच्या कार्यशाळेत जात असे. ते नेहमी वडिलांचे अनुकरण करीत असे त्यांचे वडील तेथील हत्यारांपासून नेहमी दूर ठेवत असे पण एकदा त्यांचे वडील कोणाशी तरी बोलत असताना अनावधानपणे त्याने सुई हातात घेतली व वडिलांचे अनुकरण करण्याच्या नादात नकळत सुई त्यांच्या डोळ्यात घुसली. लुई जागेवरच बेशुद्ध पडला पण जंतुसंसर्ग इतका वाढला की एका डोळ्याबरोबर कालांतराने दुसऱ्या डोळ्याची दृष्टीही गेली व लुई ब्रेल हा दृष्टीहीन झाला.

२. लुई ब्रेल यांचा जन्म ४ जानेवरी १८०९ साली फ्रांस देशाची राजधानी पॅरिसहून सुमारे ४५ मैल लांब कुपव्रे नावाच्या गावात झाला. त्याच्या वडिलांचे नाव सायमन-रेने-ब्रेल व आईचे नाव मोनीक होते. त्यांना दोन बहिणी व भाऊ होते.

लुई ब्रेल यांचे वडील जिनगर होते. वडिलांच्या कार्यशाळेत वडिलांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्या डोळ्यात सुई केली व ते बेशुद्ध पडले. संसर्ग इतका वाढला की ते दृष्टीहीन झाले.

लुईना पालकांकडून प्रोत्साहन मिळत असे व त्यांच्या पाठिंब्याने लुई यांनी शिक्षण घेतले. सैनिकांच्या कामी येणारी गुप्त संकेत लिपी त्यांना ज्ञात झाली व सैनिक युद्धकाळात अंधारात बोटाच्या स्पर्शाने वरिष्ठांचे संकेत ओळखू शकतात. या ज्ञानातूनच त्यांना प्रकाशाचा किरण मिळाला. यातूनच त्यांनी ब्रेल लिपी विकसित केली.

**प्र २.** १. लुई ब्रेल वडील हे एक जिनगर होते.

२. लुई ब्रेल वडिलांबरोबर त्यांच्या कार्यशाळेत जात असे.

३. पालकांकडून लुई ब्रेलला नेहमी प्रोत्साहन मिळत असे.

४. लुई ब्रेल स्पर्श आणि वासाच्या साहाय्याने वस्तू ओळखत असे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | दोन, एक | २. | वडिलांचे | ३. | कार्यक्षमता | | |
| | ४. | दृष्टीही | ५. | संकेत | | | | |
| **प्र ४.** | १. | पिता | २. | नयन | ३. | नजर | | |
| | ४. | लढा | ५. | काळोख | ६. | नित्य | | |
| **प्र ५.** | १. | मृत्यू | २. | अशक्य | ३. | उजेड | ४. | शेवट |
| **प्र ६.** | १. | अनेकवचन | २. | अनेकवचन | ३. | एकवचन | | |
| | ४. | एकवचन | ५. | एकवचन | | | | |
| **प्र ७.** | १. | स्त्रीलिंग | २. | स्त्रीलिंग | ३. | पुल्लिंग | | |

## १३ कुंभारासारखा गुरु नाही

### ✦ काव्य परिचय

• कुंभार जसे माती पासून घडे बनवितो. त्याचे उदाहरण देत गुरूंचे आपल्या जीवनात स्थान वर्णिले आहे. कुंभार व गुरु यांचे साम्य कवितेत सांगितले आहे.

### ✦ उद्देश

• गुरूविषयीचे महत्त्व, त्याचे कार्य विद्यार्थ्यांना पटवून देणे.

• गुरूबद्दल आदर विद्यार्थ्यांच्या मनात उमटविणे.

### ✦ अध्यापन कृती

• कुंभार मडकी कशाप्रकारे तयार करतो याचा व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवावा किंवा विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

• गुरु आपल्याला काय-काय करतात हे विद्यार्थ्यांकडून प्रश्नोत्तराच्या साहाय्याने काढून घ्यावे. नंतर कुंभार व गुरूंचे साम्य समजावत विद्यार्थ्यांना कविता शिकवावी.

• कविता ताला-सुरात म्हणवून द्यावी.

• प्रश्न-उत्तरांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना कविता समजली आहे की नाही हे पडताळून पहावे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. कवीने 'कुंभारासारखा गुरु नाही' या कवितेत शिक्षक कुंभार या गुरूचे वर्णन केले आहे.

२. कुंभार जेव्हा माती आधी तुडवतो व नंतर कुरवाळतो तेव्हा मातीच्या गोळ्याला आकार येतो.

३. घट थोराघरी, राऊळात म्हणजेच मंदिरात जातात.

४. या कवितेत 'कुंभार' हा शब्द गुरूस अनुसरून वापरला आहे.

**प्र २.** १. कुंभार जसे मातीला धपाटे (तळहाताचे फटके) देतो त्याप्रमाणे जगात दुसरा गुरू नाही.

तो प्रथम मातीला चांगले पायाखाली तुडवतो; मग हाताने कुरवाळतो म्हणजे माती एकत्र करतो तो ओल्या मातीला आकार देतो.

ती बनवलेली मातीची भांडी थोरांच्या घरी जातात; तर काही देवळात जातात.

ते मडके पाणी भरण्यासाठी वापरले जाते; तर काही भांड्याचा मद्यपानासाठी वापर होतो. काही भांड्याचा वापर हा पूजेच्या कलशासाठी होतो तर कोणी (गोरसाचा) माठ म्हणून वापर करतात.

अशा प्रकारे जेव्हा गुरू शिष्यांना शिकवण देतात. त्यांच्यावर संस्कार करतात तेव्हा त्यांनाही एक मार्ग मिळतो. ज्याप्रमाणे घट कोठे, कोणाच्या घरी गेले आहेत हे कुंभाराला माहीत नसते त्याप्रमाणेच आपला शिष्य कुठे, कोणत्या मार्गावर गेला आहे हे शिक्षकाला माहीत नसते. शिष्याला मान-प्रतिष्ठा, उच्च पदवी मिळते; पण शिक्षक/गुरू मात्र तेथेच दुसऱ्या विद्यार्थ्यांवर संस्कार घडवत असतो.

**प्र ३.** १. आधी तुडवी तुडवी मग हाती कुरवाळी
ओल्या मातीच्या गोळ्याला येई आकृती वेगळी
घट जाती थोराघरी, घट जाती राऊळात।।

२. कुणी पूजेचा कलश, कोणी गोरसाचा माठ
देता आकार गुरूने, जयाची त्याला लाभे वाट
घट पावती प्रतिष्ठा गुरू राहतो अज्ञात।।

**प्र ४.** १. दुनिया २. अग्नी ३. गृह, सदन ४. कर, हस्त

**प्र ५.** १. धपाटे २. गोळे ३. गुरू

**प्र ६.** १. लोहार २. चांभार ३. शिंपी ४. गवंडी ५. सोनार

## १४ बहुला गाय

### ✦ काव्य परिचय

- भगवान श्रीकृष्ण, त्याचे गोकुळ, तेथील गाई यांचे थोडक्यात वर्णन.
- श्रीकृष्णाचे गाईला घेऊन रानात चरायला नेणे, श्रीकृष्णाने बहुला गाईची परीक्षा घेण्याचे ठरविणे; बहुलेवर श्रीकृष्ण भूरळ पाडतो. सायंकाळी कृष्णाची मुरली वाजल्यावर सर्व गाई घरी परततात; पण बहुला रानातच चरत राहते. बहुला भानावर येते तेव्हा कृष्णरूपी वाघ तिच्यासमोर येतो. बहुला कृष्णरूपी वाघाच्या परीक्षेत कशी सफल होते हे पाठात वर्णिले आहे.

### ✦ उद्देश

- कृष्णभक्तीचे वर्णन विद्यार्थ्यांना करून देणे.
- विद्यार्थ्यांना भक्ती कशी निष्ठेने करावी हे बहुलाच्या उदाहरणातून पटवून देणे.

### ✦ अध्यापन कृती

- पाठातील कथा सांगण्यापूर्वी विद्यार्थ्यांना भगवान श्रीकृष्णाचा थोडक्यात परिचय करवून द्यावा.

- भगवान श्रीकृष्णाच्या लिलेची ओळख करून द्यावी.
- पाठातील कथा गोष्टीरूपाने सांगावी. नंतर पाठ्यपुस्तकातील पाठ परत शिकवावा. कठीण शब्दांचे अर्थ सांगत पाठ समजवावा.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. नंदराजाच्या घरी गाईचे मोठे खिल्लार होते त्या गाईंमधील सर्वात सुंदर एक गाय. ती पुष्कळ दूध देई; म्हणून तिला 'बहुला' म्हणत. तिची कृष्णावर फार भक्ती होती. एक क्षणभर सुद्धा ती कृष्णापासून दूर जात नसे. नेहमी कृष्णाजवळ असायची.

२. श्रीकृष्णाला गाईची सत्त्वपरीक्षा घेण्याची इच्छा झाली. रोजच्याप्रमाणे श्रीकृष्ण परमात्मा वनात गाई घेऊन गेला. यमुनेच्या तीरावर गाई चरू लागल्या, गोपाळ खेळू लागले. त्या दिवशी बहुलेला कृष्णाने भूल पाडली. कृष्णापसून क्षणभर दूर न जाणारी गाय हिरवे-हिरवे गवत पाहून चरत-चरत दूर गेली. तिला वेळेचे व स्थळाचे भान राहिले नाही.

३. असे म्हणतात खऱ्या भक्तांची देव नेहमी परीक्षा घेत असतो. त्याचप्रमाणे या पाठात बहुला गाईची कृष्णावर फार भक्ती होती. एक क्षणभरसुद्धा ती दूर जात नसे. नेहमी कृष्णाजवळ असायची. एके दिवशी श्रीकृष्णाला असेच गाईची सत्त्वपरीक्षा घेण्याची इच्छा झाली. हिरवे-हिरवे गवत रानात दूरवर दिसल्यामुळे ती चरत-चरत दूर गेली व तिला वेळेचे भान राहिले नाही ना स्थळाची. त्या दिवशी बहुलेला भूल पाडून व्याघ्ररूपी भगवंताने बहुलेची परीक्षा घेतली.

**प्र २.** १. गाईंना रानात भगवान श्रीकृष्ण घेऊन जाई.

२. बहुलेची श्रीकृष्णावर भक्ती होती.

३. बहुलेला श्रीकृष्णाने भूल पाडली.

४. बहुलेच्या बाळाचे नाव डुब्या होते.

५. बहुला हिरव्या-हिरव्या गवताला भुलून रानात दूर गेली.

**प्र ३.** १. परमात्मा   २. वेळेचे, स्थळाचे   ३. मुरली

४. भक्ताला   ५. धावपळ

**प्र ४.** १. भगवान श्रीकृष्ण   २. कृष्णरूपी व्याघ्र   ३. श्रीकृष्ण   ४. बहुला

**प्र ५.** १. श्रद्धा   २. कसोटी, चाचणी   ३. सुरेख

४. क्षीर   ५. आसू   ६. हावरा, अधाशी

**प्र ६.** १. सकाळ   २. उत्तर   ३. विसरणे

४. दानव   ५. कमी   ६. तिकडे

**प्र ७.** १. भूल पाडणे - भुरळ पाडणे.

वाक्य - माझ्या मैत्रिणीने काढलेली सुंदर चित्रे बघून माझ्या मनाला भूल पडली.

२. केविलवाणा दिसणे - नाराज दिसणे/हीनदीन दिसणे.

वाक्य - घरात आई बराच वेळ न दिसल्यामुळे लहान बाळ केविलवाणे दिसत होते.

३. कावराबावरा होणे - भयभीत होणे/घाबरणे.

वाक्य - रमेश नवीन शाळेत गेल्यावर पहिल्या दिवशी कावराबावरा झाला.

४. भय नसणे - भीती नसणे.

वाक्य – चांगले काम केले की आपल्याला कोणाचेही भय नसते.

५. भानावर येणे – शुद्धीवर येणे.

वाक्य – भूक लागल्यानंतर मुले भानावर आली, की जेवणाची वेळ झाली तरी आपण खेळतच आहोत.

६. तावडीत सापडणे – कचाट्यात सापडणे.

वाक्य – दिवसभर शोध घेऊन अखेर चोर पोलिसांच्या तावडीत सापडला.

प्र ८. १. बैल २. गोपिका ३. देवी

४. लाडकी ५. वाघीण ६. सखा

प्र ९. १. गाई २. वासरू ३. राने

४. गवत ५. घर

## १५ निरोगी जीवन

✦ **पाठ परिचय**

• जीवनात शरीर निरोगी असणे किती महत्त्वाचे असते व निरोगी जीवनासाठी चांगल्या आरोग्यासाठी पंचसुत्री दिलेली आहे.

✦ **उद्देश**

• विद्यार्थ्यांना निरोगी जीवनाचे महत्त्व पटवून देणे.
• व्यायाम, योग्य आहाराचे महत्त्व पटवून देणे.
• वाईट सवयी-चांगल्या सवयींचा फरक समजावून सांगणे.

✦ **अध्यापन कृती**

• विद्यार्थ्यांकडून प्रथम व्यायाम, आहार इत्यादी विषयी काय मत आहे? ते जाणून घेणे.

✦ **उत्तरे**

प्र १. १. माणसाचे मानसिक, शारीरिक व भावनिक असंतुलन आजच्या जीवनशैलीमुळे बिघडले आहे. सध्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात बदलत्या जीवनशैलीमुळे सर्वांचेच शारीरिक कष्ट कमी झाले आहेत. बुद्धीच्या जोरावर त्याने नवनवीन शोध लावले; परंतु या बदललेल्या जीवनशैलीमुळे कष्ट व शुद्ध मोकळी हवा मिळत नसल्याने त्याचे मानसिक, शारीरिक व भावनिक असंतुलन वाढत जात आहे.

२. "भारतीय संविधानात लोकांचे पोषण व राहणीमान यांचा दर्जा वाढविणे तसेच लोकांचे आरोग्य सुधारणे ही राज्याची मूळ जबाबदारी आहे." असे म्हटले आहे.

३. उत्तम आरोग्यासाठी पंचसुत्री आहेत. १) जेवण, २) झोप, ३) व्यायाम, ४) वाईट सवयी/व्यसनांपासून दूर रहाणे, ५) चांगल्या सवयी.

आपण नेहमी पौष्टिक आहार घेतलाच पाहिजे; त्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते.

रात्री लवकर झोपून सकाळी लवकर उठणे यामुळे आजार बळावतात.

रोज योग किंवा शारीरिक व्यायाम हा केलाच पाहिजे. वाईट सवयी हा आरोग्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यापासून दूर राहणे महत्त्वाचे असते.

चांगल्या सवयी व नियोजन हे उत्तम आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण असते.

प्र २. १. मुलांच्या सर्वांगीण विकासामधील महत्त्वाचा घटक उत्तम आरोग्य हा होय.

२. सध्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग आहे.

३. निसर्गाने आपल्यावर उदार होऊन उत्तम शरीर आणि मन ही अनमोल देणगी दिली आहे.

४. चांगल्या व्यक्तिमत्वाकरिता आत्मविश्वास हा एक मुलभूत गुण आहे.

५. ७ एप्रिलला 'जागतिक आरोग्य दिवस' हा दिवस साजरा केला जातो.

६. जेवण, झोप, व्यायाम, वाईट सवयी/व्यसनांपासून दूर रहाणे, चांगल्या सवयी ह्या आरोग्यासाठी पंचसुत्री आहेत.

**प्र ३.** १. शारीरिक  २. बुद्धीच्या  ३. मनुष्यजीवनात  ४. वाईट

**प्र ४.** १. आयुष्य  २. प्रगती  ३. निद्रा
४. दिलदार, दानशूर  ५. उत्कृष्ट

**प्र ५.** १. जवळ  २. एक  ३. वाईट
४. क्षुद्र, निकृष्ट  ५. मित्र

## १६ व्याकरण

### १. लिंग

**प्र १.**

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुसकलिंग |
|---|---|---|
| सुतार | शाळा | घड्याळ |
| चंद्र | बाग | पाणी |
| डोंगर | भाजी | झाड |
| सूर्य | आजी | पुस्तक |
| | दरी | फूल |
| | | ऊन |

**प्र २.** १. तो  २. ती  ३. ते  ४. ती  ५. ते
६. ती  ७. ती  ८. ती  ९. तो  १०. ती

### २. वचन

**प्र १.** १. <u>एक</u> नदी  २. <u>अनेक</u> गाई
३. <u>एक</u> कावळा  ४. <u>अनेक</u> चिमण्या

**प्र २.** १. लाकूड  २. घरे  ३. पाट्या  ४. साडी
५. कान  ६. ससे  ७. नाले  ८. मासा
९. फळ  १०. होड्या

### ३. नाम

**प्र १.** १. चिमणी  २. हिमालय, पर्वत  ३. भारत, देश
४. फळ, आंबा  ५. मोर, पक्षी  ६. गणेश
७. आजी, गोष्ट  ८. लाडू  ९. राम, घर
१०. आई

## ४. सर्वनाम

**प्र १.** १. तुला २. त्यांना ३. त्या ४. मी ५. तुझे
६. आपण ७. आम्हाला ८. आपण ९. तुम्ही

**प्र २.** १. आपला - भारत आपला देश आहे.
२. त्याला - त्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.
३. तुझा - तुझा मुलगा खूप हुशार आहे.
४. आम्हाला - आज आम्हाला राणी लक्ष्मीबाई पाठ शिकविला.
५. मला - मला गावाला जायला खूप आवडते.

## ५. विशेषण

**प्र १.** १. पिवळा २. सुंदर ३. निळा ४. पाणीदार
५. हसरा ६. भित्रा ७. आंबट ८. असंख्य

**प्र २.** १. सुंदर २. हुशार ३. उंच ४. रडका
५. खोडकर

## ६. क्रियापद

**प्र १.** १. खेळतात २. जाईन ३. करतो
४. आणला ५. ओरडले ६. पाहिले

**प्र २.** १. ब २. अ ३. क ४. ड

**प्र ३.** १. वाचतो २. ढकलतो ३. उचलतो
४. झोपतो

## ७. काळ

**प्र १.** १. भविष्यकाळ २. भूतकाळ
३. वर्तमानकाळ ४. भूतकाळ
५. वर्तमानकाळ ६. भविष्यकाळ
७. भूतकाळ ८. भविष्यकाळ
९. भूतकाळ १०. वर्तमानकाळ